MHGA130002962024

सत्र खटला क्र.३७/२०२४
महा.शासन मार्फत उपपोलीस स्टेशन,
भामरागड–वि– पेका

निशानी ०३ वरील आदेश
(दि.१९/०९/२०२४)

१. अर्जदार/आरोपी पेका मादी पुंगाटी याने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे भामरागड पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक ००९३/२०२३ मध्ये भा.दं. वि. कलम ४३५,४२७,३२३,१४३, १४७, १४८, १४९ व १२०(बी), सह कलम ५/२८ भारतीय हत्यार कायदा व कलम १३,१६,१८,२०,२३ युऐपी कायदा अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार हा राह. मिळगुळवंचा ता. भामरागड, जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, तो मौजा मिळगुळवंचा येथील स्थायी रहिवासी आहे. आरोपीला दि २१.३.२०२४ रोजी अटक करण्यात आली. जो गुन्हा त्याने केला नाही त्या गुन्हयात खोटेपणाने गुंतविलेले आहे. जर अर्जदार हा प्रतिबंधी संघटनेचा सदस्य असला असता तर बिना बंदुक आणि सहकार्याशिवाय पोलिस स्टेशनजवळ का गेला असता. सदर प्रकरणात जवळ पास संपूर्ण तपास झाला आहे. आरोपी अर्जदाराचीसुध्दा चौकशी झाली आहे. परंतु त्याचे विरुध्द कोणताही पुरावा मिळून आला नाही. अर्जदार हा निष्पाप असून त्यास खोट्या गुन्हयात गुंतविले आहे. तसेच एफ आय आर मध्ये त्याचे नावाचा उल्लेख नाही. अर्जदार हा माडीया समाजाचा असून मिळगुळवंचाचा स्थायी रहिवासी आहे त्याचा पुर्व इतिहास हा निष्कलंकीत आहे. त्यास म्हातारे आई वडील, भाउ, पत्नी आणि मुले असा आप्त परिवार आहे. असे असतांना आरोपी हा प्रतिबधीत संघटनेमध्ये कार्य करु शकत नाही. सदर प्रकरणात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सपुंर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यास सदर गुन्हात खोटेपणाने

गुंतविले आहे. तो न्यायालयाच्या शर्ती व अटींचे पालन करण्यास तयार आहे. करीता अर्जदारास जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

३. सरकारी वकीलांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र ०३ नुसार दिले की,त्यांनी अर्जास विरोध दर्शवून म्हणने सादर केले की, १५ते २० नक्षल हे दि १९.१२.२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वा. चे दरम्यान घटनास्थळावर दाखल होउन त्यांनी वाहनांची जाळपोळ करुन जवळ पास रु. ३१,५०,०००/– चे नुकसान केले कारण फिर्यादी व कॉन्ट्क्टर हे हिददूर व दोबूर चा रस्ता बनविण्याचे काम करीत होते. नक्षलांना विकास नको, करीता ते रस्ता बनविण्याचे कामात अडथळा करीत होते. दि. २१.३.२०२४ रोजी आरोपी पेकाला अटकर करण्यात आली. तपासा दरम्यान त्याचे जवळ कारडेक्स वायर १०७ फुट, डिटोनेटर, मिळुन आला. त्यावरुन अर्जदाराचा नक्षल कारवायाशी संबध असल्याचे दिसुन येते. अर्जदाराचा अशा गंभीर गुन्हयात सहभाग असल्याने त्याचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, दि. १९.१२.२०२३ रोजी रात्री सुमारे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी व त्याचे सोबत असलेले १५ ते २० रोड कामावरील कामगार घरात जेवण बनवित असतांना काळे कपडे घातलेले बंदुकधारी माओवादी मल्लेश, निखील, संगिता, जैनी, क्रान्ती, जानकी, दिलीप, विजय,मुकेश, ललिता, नागेश,देवा, लोकेश, मालू व साध्या वेशातील जनमिलीशीया पांडू, सैनू, राकेश, कातो, पेका तसेच त्यांचे सोबत २५ ते ३० संख्येतील भारत सरकारने प्रतिबंधीत केलेल्या कम्युनिस्ट पार्टी, भामरागड दलम, कंपनी १० मधील स्त्री व पुरुष माओवादी यांनी प्रफुल गेडाम यास हाताने मारहान केले व फिर्यादीला व त्याचे सोबत असलेल्या इतर कामगारांना बंदुकीचा धाक दाखवून रुम बाहेर काढून गावातील गोटूल जवळ नेउन माओवादी व समर्थक यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन हिदुर ते दोबूर पर्यंत रोड बांधकामावरील शासकीय रस्त्याचे काम बंद पाडण्याचे कट रचून कामासाठी लागणारे वाहनांची डिझेल टाकून वाहनांची जाळपोळ केली, असे एकुण ३१,५०,०००/– चे नुकसान केले. अशा फिर्यादवरून भामरागड पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक ००९३/२०२३ मध्ये भा.दं.वि. कलम ४३५,४२७,३२३,१४३, १४७, १४८, १४९ व १२०(बी), सह कलम ५/२८ भारतीय हत्यार कायदा व कलम १३,१६,१८,२०,२३

युऐपी कायदा अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

५. अर्जदाराच्या वतीने असा युक्ती वाद मांडण्यात आला की, यापुर्वी अर्जदाराने जामीन अर्ज दाखल केला होता. परंतू तपास अपुर्ण असल्याचे कारणाने तो अर्ज नामंजुर करण्यात आला. त्यानंतर तपासपुर्ण होउन दोषारोप पत्र दि ३०.८.२०२४ रोजी दाखल करण्यात आले होते. आरोपीचे निवेदन नियमाप्रमाणे नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने दाखवलेली जप्ती सुध्दा योग्य नाही. आरोपी हा नक्षल असल्याबाबतचा कोणताही पुरावा गोळा करण्यात आलेला नाही. तपास पुर्ण होउन दोषारोप पत्र दाखल झालेले आहे. त्यामुळे आरोपीला गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. करीता आरोपीचा जामीन मंजुर करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली.

६. या उलट सरकारी वकील श्री भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, आरोपी हा नक्षल समर्थक असल्याने तो जनमिलीशीया असल्याचा पुरावा गोळा केला असून त्याबाबत पुर्ण माहिती दोषारोप पत्रात पान क्र. १२५ ते १३७ प्रमाणे दाखल केले आहे. आरोपीचे निवेदनाप्रमाणे जे साहित्य मिळालेले आहे ते साहित्य नक्षल कारवायाकरीता वापरण्यात येतात. त्यामुळे आरोपी विरुध्द पुरावा गोळा करुन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे आरोपी यास जामीन दिल्यास तो पुन्हा नक्षल कारवाईमध्ये भाग घ ोण्याची शक्यता नाकारता येणार नाही. करीता जामीन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

७. तक्रारमध्ये पेका असे नमुद केलेले आहे. त्यावरुन आरोपीतर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, पेका हे पुरुषाला संबोधले जाते. त्यामुळे तक्रारमध्ये आरोपीचे नाव नाही. परंतु सरकारी वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, तकारमध्ये असे नमुद करण्यात आले की, तुम जनमिलीशीया,पांडू, सैनू, राकेश, कातो व पेका इन लोगोके मोबाईल ले लो. त्यावरुन पेका हे पुरुषाकरीता नमुद नसून एक व्यक्तीकरीता नमुद केलेले आहे. सरकारी वकीलांनी युक्तीवाद मान्य करण्यासारख आहे कारण कातो व पेका असे लिहण्यात आल्याने कातो वेगळा पुरुष असून पेका वेगळा पुरुष आहे. त्यामुळे पेका हा आरोपीचा नावाचा उल्लेख फिर्यादमध्ये केल्याचे उघडपणे दिसून येते.

८. आरोपीचे निवेदन कायद्याप्रमाणे योग्य नमुद करण्यात आले अथवा नाही हे

पुराव्याअंती ठरवीता येईल. परंतू आरोपीने तपासादरम्यान दिलेल्या निवेदनाप्रमाणे पंचासमक्ष १०७ फुट कॉरडेक्स वायर, दोन डिटोनेटर आणि १५ फुट वायर जप्त करण्यात आले. जप्ती करतांना छायाचित्र आरोपी ,पंच व पोलिस अधिकारी दिसुन येत असून आरोपीने स्वतः पुरुन ठेवलेले साहित्य काढून दिल्याचे दिसून येते. सदरच्या वस्तु शेतीकरणा–या व्यक्तीकरीता आवश्यक नसुन ते नक्षल कारवायाकरीता वापरतात, त्यामुळे मिळालेल्या साहित्यावरुन आरोपीचा नक्षलांशी संबंध असल्याचे सरकारी वकीलाचा युक्तीवाद योग्य वाटतो.

९. आरोपीच्या बाबत तपासणी अधिका–याने पुरावा गोळाकरुन गावातील गुन्हयाचे नोटबूक दाखल केलेले आहे. ते दस्त क. १२५ ते १३२ चे अवलोकन केले असता आरोपी हा जनमिलीशीया सी –२ असल्याचा पुरावा गोळा केलेला आहे. त्यावरुन आरोपी हा भामरागड दलम व गटट्ा दलम येथे कार्यरत असल्याचे दिसून येते. करीता जरी गुन्हयाचा तपास पुर्ण झाला असून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असले तरी आरोपी विरुध्द गोळा केलेल्या पुराव्यावरुन तो नक्षलांच्या कारवायात भाग घेतो तसेच तो नक्षलांकरीता जेवण्याची व्यवस्था गावक–याकडून करतो असे दिसून येते. त्यामुळे अर्जदाराला जामीन मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

जामीन अर्ज निशानी ०३ नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.09.20 18:37:11 +0530

अहेरी.
दि. १९/०९/२०२४

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.